दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शनिवार दि.४ ऑक्टोबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ४८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Friday 4 Oct 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 48 ● Pages 4 ● Rate 4 Rs

## ऊठसूट एकनाथ शिंदेंवर टीका खपवून घेणार नाही

**मुंबई**–मंत्री उदय सामंत यांनी गणेश नाईक यांच्या टीकेला उत्तर देताना म्हणाले, नालायकांच्या हाती सत्ता देऊ नये, म्हणजेच त्याच्या हाती सत्ता दिली जाणार नाही. समन्वय समितीत ही संवाद साधण्यासाठी आहे. ऊठसूट एकनाथ शिंदेंवर टीका खपवून घेणार नाही, नाईकांना काही अडचणी असतील तर त्यांनी एकनाथ शिंदे यांची वेळ घ्यावी. ज्याची ज्या पद्धतीने कुवत असते त्याला ते पद मिळते. आमच्या खासदारांनाही बोलता येत नाही का? पण साहेब सांगतात की मित्र पक्षावर बोलू नका म्हणून सर्व शांत आहेत.

# नगराध्यक्षांची निवड यापुढे जनतेतूनच

# दिवाळीनंतर वाजणार निवडणुकीचा बिगुल

## थेट जनतेतून होणाऱ्या निवडणुकीकडे राज्याचे लक्ष

**दैनिक वादळ वार्ता । मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील नगरपरिषदा आणि नगरपंचायती साठी थेट नगराध्यक्ष निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्यातील नगर परिषदांबरोबरच नगरपंचायतींच्या नगराध्यक्ष पदासाठी आरक्षण निश्चित करण्याची सोडत सोमवार,दि.६ ऑक्टोबर २०२५ रोजी मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावरील परिषद सभागृहात काढण्यात येणार आहे.दिवाळीचा उत्साह ओसरताच या निवडणुका जाहीर होण्याची चिन्हे असल्या मुळे राज्यातील नगर राजकारणात चैतन्य निर्माण झाले आहे.

### थेट जनतेतून निवड

यंदा प्रथमच नगराध्यक्षांची निवड थेट जनतेतून होणार आहे.यापूर्वी नगर सेवकांमधून नगराध्यक्षाची निवड केली जात होती.मात्र राज्य सरकारच्या निर्णयानंतर नागरिकांना आपला नगराध्यक्ष थेट मतदानातून निवडण्याचा अधिकार मिळणार आहे.त्यामुळे या निवडणुका अधिक चुरशीच्या,रंगतदार आणि थेट उमेदवारांच्या व्यक्तिमत्त्वावर आधारित होणार आहेत.

### सोडतीतून आरक्षण स्पष्ट

६ ऑक्टोबरच्या सोडतीतून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय, भटक्या-विमुक्त तसेच महिलांसाठी राखीव जागांचे वाटप निश्चित केले जाईल.राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार ही प्रक्रिया पार पाडली जाणार असून, पारदर्शकतेसाठी सर्व राजकीय पक्ष आणि अधिकारी उपस्थित राहणार आहेत.




### दिवाळीनंतर राजकीय रणशिंग

दिवाळीनंतर लगेचच नगरपरिषदा व नगर पंचायतींच्यानिवडणुका होण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे राज्यातील शेकडो शहरांमध्ये राजकीय हालचालींना वेग येईल.उमेदवारांची निवड, गटबाजी,जातीय समीकरणे आणि स्थानिक पातळीवरील राजकीय दबाव या सर्व घटकांमुळे निवडणुका तापणार आहेत.

### पार्श्वभूमी आणि वाद

नगराध्यक्ष पदांच्या आरक्षणावरून मागील काही काळात राज्यात मोठे वाद झाले.अनेक ठिकाणी न्यायालयीन प्रक्रिया, समाजघटकांचा दबाव आणि महिलांसाठी असलेल्या आरक्षणाच्या टक्केवारी वरून गोंधळ निर्माण झाला होता.काही नगर पंचायतींमध्ये निवडणुका रखडण्याची वेळही आली होती. त्यामुळे यंदाची सोडत ऐतिहासिक ठरणार आहे.

### पक्षीय समीकरणे

काँग्रेस,भाजप,राष्ट्रवादी काँग्रेस,शिवसेना शिंदे गट, शिवसेना(उबाठा गट),मनसे आणि स्थानिक आघाड्या या सर्व पक्षांसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची ठरणार आहे.थेट नगराध्यक्ष निवडणुकी मुळे पक्षीय संघटनां सोबतच स्थानिक नेत्यांच्या लोकप्रियतेची खरी परीक्षा लागणार आहे.



### नागरिकांचा उत्साह

थेट निवडणुकीच्या निर्णयामुळे नागरिकां मध्ये उत्सुकता आणि उत्साह वाढला आहे. गावोगावी आपला नगराध्यक्ष कोण? या चर्चांना उधाण आले आहे.सामाजिक कार्यकर्ते, तरुण, व्यावसायिक अशा नव्या चेहऱ्यांनाही आता राजकारणात संधी मिळू शकते.



# रस्त्यांना भेगा,भिंतींना तडे; डोंगर कोसळतोय का?

## कपिलधारवाडीत जिल्हाधिकाऱ्यांची पाहणी,गावकऱ्यांना दिलासा

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून झालेल्या सततच्या आणि अतिवृष्टीमुळे मौजे कपिलधारवाडी येथे गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे . गावातील अनेक घरांच्या भिंतींना तडे गेले आहेत , जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या भिंतींना व पाया भागाला भेगा पडल्या आहेत , तसेच कपिलधारवाडी ते मन्मथस्वामी मंदिर देवस्थानकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात भेगा पडल्यामुळे लोकांमध्ये भीतीचे वातावरण आहे . डोंगर परिसर सरकतोय का , कोसळतोय का , अशी भीती ग्रामस्थांमध्ये व्यक्त केली जात होती .बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , तहसीलदार चंद्रकांत शेळके , मंडळ अधिकारी शीतल चाटे , तलाठी अनिल गायकवाड यांनी कपिलधारवाडी



येथे प्रत्यक्ष पाहणी केली . या वेळी ग्रामस्थ मंजुषाताई नवले , केशव शिंदे , ग्रा . पं . सदस्य मिठू शिंदे , रुद्र महाकले , संदीप नवले , अंकुश महाकले , चंद्रसेन महाकले , भिवा शिंदे तसेच महिला ग्रामस्थ सविता शिंदे , मनीषा शिंदे , लताबाई भोसले , सुमित्रा शिंदे , कासाबाई जाधव मोठ्या संख्येने उपस्थित होते .

जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी ग्रामस्थांशी चर्चा करून परिस्थितीची माहिती घेतली . त्यांनी सांगितले की , हा प्रकार नेमका कशामुळे घडून आला यासाठी तांत्रिक समितीमार्फत तात्काळ तपासणी करण्यात येईल . त्यानंतर कायमस्वरूपी पुनर्वसन अथवा इतर उपाययोजना याबद्दल कार्यवाही करण्यात येईल . त्यांनी पुढे सांगितले की , ज्यांना नरेगा अंतर्गत मजुरीची कामे आवश्यक आहेत त्यांना तात्काळ कामे उपलब्ध करून दिली जातील . विद्यार्थ्यांना जवळच्या शाळेत जाण्याची व्यवस्था शिक्षण विभागामार्फत केली जाईल . तसेच मन्मथ स्वामी देवस्थान येथे स्थलांतरित गावकऱ्यांची पूर्णतः व्यवस्था प्रशासनामार्फत करण्यात येईल . ग्रामस्थांनी प्रशासनाकडे मागणी केली की , डोंगर सरकल्यामुळे आमच्या घरांचे , शाळेचे व मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचे मोठे नुकसान झाले आहे . प्रशासनाने तात्काळ ठोस पावले उचलावीत , अन्यथा गावाच्या सुरक्षिततेवर मोठा प्रश्न उभा राहील . आज दसरा असूनही प्रशासनाने तातडीने पावले उचलत भेट दिली , जिल्हाधिकारी यांनी स्वतः ग्रामस्थांना आश्वस्त केले , यामुळे ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे आभार मानले .

# तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये महात्मा गांधी जयंतीनिमित्त अभिवादन



**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी इंग्लिश स्कूल, बीड येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त गुरुवारी (दि.२) अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी गांधीजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले.

शाळेच्या प्राचार्या सौ. उमा जगतकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# गावातून बळजबरीने चारचाकी वाहनात नेले;अन् 'तिला' वासनेची शिकार बनवले

## आष्टी पोलिस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल!

**दैनिक वादळ वार्ता**
**आष्टी । प्रतिनिधी**

१४ वर्षीय अल्पवयीन मुलीला बळजबरीने चारचाकी वाहनात नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याची घटना समोर आली असून या प्रकरणी आष्टी पोलिस ठाण्यात मंगळवारी पाच जणांविरुद्ध विविध कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आष्टी पोलिस ठाणे हद्दीतील एका गावातील १४ वर्षीय अल्पवयीन मुलीला २५ सप्टेंबर रोजी तिच्या गावातून बळजबरीने उचलून चारचाकी वाहनात मित्रांच्या मदतीने खडकत येथे नेले व तिथून तिला पनवेल येथे नेऊन तिच्यावर अत्याचार केल्यानंतर २७ रोजी मुलीला गावात आणून सोडले.मुलीने घडलेला प्रसंग आई वडिलांना सांगितल्यानंतर त्याने २९ रोजी आष्टी पोलिस ठाण्यात धाव घेत घडलेला प्रसंग सांगितला.या प्रकरणी अत्याचार करणारा पवन पोठरे वय वर्ष २४ रा.डोणगांव ता.जामखेड जि.अहिल्यानगर याच्यासह त्याच्या चार साथीदारांवर आष्टी पोलिस ठाण्यात विविध




कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मुख्य आरोपी पवन पोठरे याला अटक करण्यात आली असुन पुढील तपास पोलीस निरीक्षक शरद भुतेकर याच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक एन.बी.सुर्यवंशी व पोलीस अंमलदार सचिन पवळ करीत आहेत.

# मुलीची आत्महत्या,सात जणांविरुद्ध गुन्हा

## लग्नाचे आमिष दाखवून नकार,आरोपींना अटक

**दैनिक वादळ वार्ता**
**नदीम पटेल । निलंगा**

निलंग्याजवळील साई नगर मुबारकपूर तांडा येथील तलावात उडी मारून केलेल्या तरुणीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, निलंगा पोलीस ठाण्यात सात आत्महत्या एका जणांविरुद्ध गुन्हा दाखल मृत पौर्णिमा करण्यात आला असून, पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.पौर्णिमा गोरोबा कांबळे (वाडीकर) (वय २९रा. आंबेडकर नगर, निलंगा) असेमयत तरुणीचे नाव आहे.तिने २५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता दापका हद्दीतील साई नगर सोसायटी येथील तलावात उडी मारून आत्महत्या केली होती.त्यानंतर गोरोबा रामराव कांबळे (वाडीकर) या मयत मुलीचे वडीलांनी फिर्याद दिली. त्यानुसार याप्रकरणी पोलिसांनी सूरज विजयकुमार मुळे (मुख्य आरोपी), विजयकुमार शेषराव मुळे (वडील), शकुंतला विजयकुमार मुळे (आई), धीरज विजयकुमार मुळे (भाऊ हे सर्व रा. साई नगर, दापका येथील आहेत.), बि.झेड. जाधव (मामा, रा. नळेगाव), अनिकेत (अॅटो चालक), इतर एक अनोळखी आरोपी यांच्याविरुद्ध निलंगा पोलिस ठाण्यात अॅट्रॉसिटी आणि आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मयत मुलीचे वडील गोरोबा कांबळे यांनी निलंगा पोलीस ठाण्यात तक्रार दिली की, मुख्य आरोपी सूरज विजयकुमार मुळे (वय २९) याची आणि पौर्णिमा यांची ओळख डान्स क्लासेसच्या माध्यमातून झाली होती. त्यांच्यात प्रेमसंबंध निर्माण झाले होते. मात्र, सुरजच्या कुटुंबीयांचा या प्रेम विवाहास विरोध होता. वडिलांच्या म्हणण्यानुसार, आरोपी सुरजने पौर्णिमा यांना लग्नाचे आमिष दाखवले. सूरज आणि इतर आरोपींनी संगनमत करून, पौर्णिमा यांना जातीवाचक शिवीगाळ करून लग्न करण्यास नकार दिला. या कारणांमुळे माझ्या मुलीला आत्महत्येसाठी प्रवृत्त करण्यात आले, असे फिर्यादीत म्हटले.



# नवदुर्गा पुरस्काराने चित्रकार प्रियंका गुरव सन्मानित

**दैनिक वादळ वार्ता**
**पुणे । प्रतिनिधी**

भारती विद्यापीठ, पुणे तसेच अभिजीत दादा कदम मित्र मंडळ व प्रतिष्ठान ट्रस्ट, कोथरूड यांच्या वतीने आयोजित नवदुर्गा पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील महिलांना त्यांच्या कार्याबद्दल गौरविण्यात आले.यामध्ये चित्रकार कु. प्रियंका चंद्रहंस गुरव हिला उत्कृष्ट गुणगौरव विद्यार्थिनी या विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तिच्या शैक्षणिक व कला क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीचा यावेळी विशेष गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक अॅड. श्री. रामचंद्र कदम उर्फ चंदू शेठ यांनी भूषविले. यावेळी मंचावर डॉ. काकासाहेब जाधव, डॉ. सुहास मोहिते, प्रा. सागर खळतकर, प्रा. सुनील पवार, श्री. सागर सुबराव कदम आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाला अनेक मान्यवर, विद्यार्थी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन केले.



संपादकीय

# क्रिकेटनीती



आशिया चषक स्पर्धेत भारताने काल पाकिस्तानचा पाच विकेट्स राखून पराभव केला आणि ट्रॉफीवर नाव कोरले. आशिया चषकाच्या अंतिम सामन्यात तिलक वर्माचे अर्धशतक आणि फिरकीपटू कुलदीप यादव आणि वरुण चक्रवर्ती यांच्या जोरदार कामगिरीच्या जोरावर भारताने पाकिस्तानला रोमहर्षक सामन्यात पाच विकेट्सनी पराभूत केले.टी-२० चषकाच्या स्पर्धेतील भारताचा हा दुसरा किताब आहे. भारताने पाकला माफक १४७ धावांवर बाद केल्यावर भारताने दोन चेंडू राखून पाकचे हे माफक आव्हान परतवून लावले. पण या स्पर्धेत भारताचा विजय हा ठरलेलाच होता आणि पाककडे ना खेळण्याची जिद्द होती, ना त्यांच्याकडे लढण्याची क्षमता. कारण 'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारत पाकमधील संबंध अत्यंत खराब झाले आहेत आणि त्यामुळे तसेही या सामन्यांना कुणी प्रेक्षक नव्हते. पूर्वी भारत-पाक सामने असले, की थाऊजंड मेगाव्होट्सची लढत असायची. पाकिस्तानचे प्रेक्षक आपले रेडिओ फोडून टाकायचे आणि टीव्ही सेट्स तोडून टाकायचे. पण आजकाल सामन्यात पाकच्या देशद्रोही कारवायांबद्दल इतका संताप निर्माण होत आहे, की काल सामना कधी होता आणि कधी संपला हेही कुणाला कळले नाही. कारण पाकच्या मांडीवर बसून सशस्त्र कारवाया करणाऱ्या दहशतवाद्यांनी भारतातील निरपराध नागरिकांना कंठस्नान घातले आहे आणि त्यामुळे त्या देशाविरोधात एक प्रकारे राग आणि संताप सामान्य माणसाच्या मनात निर्माण झाला आहे. पण क्रिकेट हे क्रिकेट आहे हे लक्षात घेऊन भारताने सामने तर खेळले पण पाकविरोधात संताप खेळाडूंनी व्यक्त केला आणि तो पाकच्या पराभवातच दिसून आला. या सामन्यात मैदानावर जे नाट्य घडले त्यापेक्षा जास्त सामन्यानंतर घडले. त्यावरून भारताचा पाकवर राग आणि संताप दिसून येतो. तसेच पहेलगाम हल्ल्यात ठार झालेल्या निरपराध विधवांच्या कपाळावरचे कुंकू पुसले गेल्याचा प्रत्येक भारतीयाच्या मनात कसा राग धुमसत आहे हे यावरून लक्षात येते.सामना पार पडला तो दुबईला आणि त्यानंतर पाकिस्तान क्रिकेट मंडळाचे प्रमुख मोहसीन नकवी हे तर चक्क आशिया चषक घेऊन पळाले असा आरोप केला जात आहे. आता भारताने अशी मागणी केली आहे, की पाकने हा चषक ताबडतोब परत द्यावा. त्यानुसार ते देतीलही. या सामन्यानंतरच्या काळात इतके नाट्य घडले की एखादी वेब सीरिज त्यावरून सहज तयार करता येऊ शकेल. भारतीय संघ आपल्या विजयोत्सवात मग्न असताना पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली आगा आपल्या खेळाडूंना घेऊन ड्रेसिंग रूममध्ये जाऊन बसला आणि त्याने स्वतःला बंद करून घेतले; परंतु सामन्यानंतरच्या कार्यक्रमात संपूर्ण गोंधळ दिसत होता. यावरून हे दिसत होते, की भारताने पाकला चारो खाने चित केल्यानंतर पाकमध्ये किती संताप व्यक्त होत आहे. अर्थात पाककडे काही साजरे करण्यासारखेच नव्हते. यात आणखी एक वैशिष्ट्य असे होते, की पीसीबी क्रिकेट प्रमुखांकडून आशिया चषक स्वीकारण्यास भारताची तयारी नव्हती. त्यामुळे भारताचा संताप मैदानावर दिसला, तसाच तो मैदानाबाहेरही दिसला. कारण नकवी हे पाकचे अंतर्गत मंत्रीही आहेत आणि त्यांच्यामुळे पाकच्या दहशतवाद्यांना पाठिंबा मिळतो असाही प्रवाद आहे.

भारताने आशिया चषक जिंकूनही भारताने पाकिस्तानचा सहभाग असलेली ट्रॉफी स्वीकारली नाही याला आंतरराष्ट्रीय जगात अनेक अर्थ आहे. एक म्हणजे पाक अजूनही भारतासाठी दहशतवादी राष्ट्र आहे आणि त्याचा पुरता बीमोड केल्याशिवाय भारत स्वस्थ बसणार नाही. पंतप्रधान मोदी यांनी सामन्यावर एका शब्दात भाष्य केले आहे, ते म्हणजे 'क्रीडा क्षेत्रात ऑपरेशन सिंदूर', तर अमित शहा यांनी एक शानदार विजय असे म्हटले. नंतरच्या नाट्यावर बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया यांनी नंतर ट्वीट करत सांगितले, की खेळाडूंनी अगोदरच ठरवले होते, की ट्रॉफी जिंकली तरी पाककडून स्वीकारायची नाही आणि हा निर्णय खेळाडूंनी पाळला. भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादव याने आपले सर्व मानधन पहेलगाम हल्ल्यातील विधवांना देण्याचे जाहीर केले. यापूर्वी कधीही असे वाद झाले नव्हते पण यंदाची परिस्थिती अशी होती, की वाद होणारच होता. तो झाला आणि त्यात भारतीयांनी आपण कुठेही देशभक्तीत कमी नाही हे दाखवून दिले. भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादव याने पाक खेळाडूंशी हस्तांदोलन करण्यास नकार दिला होता आणि त्यामुळे तो वादही गाजला होता. तसे तर भारत-पाक म्हटला, की कुठेही वाद होतातच. कारण पाकची पार्श्वभूमीच तशी आहे. त्यामुळे यंदा भारत-पाक सामने खेळवूच नये अशी एक चर्चा होती, पण तसे असते तर भारत-पाकिस्तानला घाबरतो असे नाव सर्वत्र गेले असते. तसे न होऊ देता भारताने सामने जिंकूनही पाककडून करंडक स्वीकारला नाही.भारत आणि पाक यांच्यात गेली काही वर्षे सामने होत नाहीत. त्याला कारण आहे, ते म्हणजे दोन्ही देश अण्वस्त्रसज्ज झाल्यानंतरही दोन्ही देशांमध्ये अनेक मुद्द्यांवर तणाव आहे. तो सीमेवरून जसा आहे तसाच तो काश्मीर प्रकरणावरूनही आहे. भारताने पाकला युद्धात जसे तीनदा हरवले, तसेच अलीकडच्या क्रिकेट सामन्यात पाकला मैदानावर हरवले आहे. त्यामुळे पाकला भारताचे वर्चस्व सहन होत नाही. त्यात भारत आता चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे तर पाक अजूनही चाचपडतो आहे. वास्तविक दोन्ही देश एकाच वेळी स्वतंत्र झाले. पण पाकने आपली सारी ऊर्जा भारतातील निरपराध नागरिकांना ठार मारण्यासाठीच खर्च केली. पाकचा भारताविषयीचा द्वेष हा सर्व स्तरांना स्पर्श करून जातो. याच वैराचे आणखी एक प्रात्यक्षिक काल दिसले.

# अस्मानी संकटात आजारी मुलाच्या मदतीला डॉ.दिनकर राऊत धावून आले

## मजुराच्या मुलाचे दहा हजार रु.चे बिल माफ करणारे डॉ.दिनकर राऊत खरे गरिबांचे कैवारी

दैनिक वादळ वार्ता

**गौतम बचुटे । केज**

डॉक्टर तुम्ही माझ्या बाळाचे प्राण वाचविले. तुमचे आमच्यावर खूप खूप उपकार आहेत. असे डोळ्यात पाणी आणून एक आई डॉक्टरांचे ऋण व्यक्त करीत होती. त्या डॉक्टरांनी दहा हजार रु. चे बिल पूर्णतः माफ करून आपल्यातील माणुसकीचे दर्शन घडवून आणि नैसर्गिक आपत्तीमध्ये अन्न-पाण्याची भ्रांत असलेल्या मजुराच्या दोन वर्षाच्या लहान मुलावर मोफत उपचार केले. या बाबतची माहिती अशी की, बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यातील मालठाणा येथील राणी आणि शिवम भोसले हे कुटुंब केज तालुक्यात साळेगाव आणि परिसरात मजूर म्हणून सोयाबीन कापणीसाठी आले होते. मात्र मजुरांनी सोयाबीन कापणीचे काम सुरू करण्या पूर्वीच मुसळधार पाऊस सुरू झाला आणि त्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे नुकसान झाले. त्यामुळे सगळेच नियोजन बिघडले. त्यामुळे मजुरांच्या हाताला काम तर नव्हते, परंतु चिखल आणि पाण्यात पूर्ण कुटुंब आणि त्यांच्या सोबतच्या मजुरांची कच्ची बच्ची जीव मुठीत धरून अन्न पाण्या वाचून उपाशी होती. काहींनी शेजारी गावात भीक मागून पोटाची आग विझविण्यासाठी भाजी



भाकरी मागितली. त्या पावसामुळे आणि चिखल पाण्याच्या दलदलीमुळे राणी आणि शिवम भोसले यांचा दोन वर्षाचा मुलगा चि. भार्गव हा आजारी पडला. त्याला निमोनिया सारखा गंभीर झाला असल्याचे निदान योगिता नर्सिंग होमचे डॉ. दिनकर राऊत यांनी केले. निमोनिया हा श्वसन आणि फुफुसाशी निगडित असलेला गंभीर आजार असल्याने भार्गव याला अतिदक्षता विभागात (आयसीयू) मध्ये व्हेंटिलेटरवर ठेवणे आवश्यक होते. त्यासाठी प्रतिदिन अडीच ते तीन हजार रु. खर्च अपेक्षित होता. या खर्चामुळे भोसले कुटुंब घाबरून गेले. त्यांनी पत्रकार गौतम बचुटे यांच्याशी संपर्क साधला. त्या नंतर गौतम बचुटे यांनी तहसीलदार राकेश गिड्डे, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष महादेव सूर्यवंशी, सचिव सुहास चिद्रवार, विकास मिरगणे, लोकरे यांच्याशी संपर्क साधला. त्यावेळी सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे, इंदानी, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक बाळासाहेब रोडे आणि इतरांनी औषधोपचारासाठी काही पैसे जमा करून त्या कुटुंबाला दिले. परंतु खर्च जास्त येणार होता. दि. १ ऑक्टोबर रोजी भार्गव याला योगिता हॉस्पिटलमध्ये अतिदक्षता विभागात दाखल करून उपचार सुरू करण्यात आले. तो उपचाराला चांगला प्रतिसाद देत होता.दरम्यान ही माहिती योगिता हॉस्पिटलचे डॉ. दिनकर राऊत यांना या मजुरीसाठी आलेल्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीची मिळताच त्यांनी चि. भार्गव यांच्यावर मोफत उपचार केले. त्यांनी भार्गवच्या आई वडिलांना धीर दिला आणि तुम्ही पैशाची चिंता करू नका. असे सांगितले. परंतु त्यांचा विश्वास बसत नव्हता.

दोन दिवसा नंतर दि. ३ ऑक्टोबर रोजी भार्गव ठणठणीत बरा झाला. डॉ. दिनकर राऊत यांनी भोसले कुटुंबियां कडून हॉस्पिटलचे झालेले दहा हजाराचे बिल पूर्णतः माफ करून त्यांच्यातील माणूसकीच दर्शन घडविले. संकटाच्या वेळी गरीब कुटुंबाला केलेल्या बद्दल डॉ. दिनकर राऊत यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

> **मेरे बच्चे की जान डॉक्टरने बहचायी, बिल देणें के लिये हमारे पास पैसे नहीं थे, इसलिये हमे डर था, मगर मेरे बच्चेके लिये डॉक्टर राऊत भगवानसेभी जादा है**
>
> **-राणी भोसले (आई)**
> **रा.मालठाणा ता. संग्रामपूर जि. बुलढाणा**

> **आम्ही मजुरीसाठी दूरवरून इथे आलो.अतिवृष्टीच्या संकटात आम्हाला खायला नसताना डॉ. राऊत सरांनी माझ्या मुलावर मोफत उपचार केले. त्या बद्दल त्यांचे ऋण व्यक्त करायला माझ्याकडे शब्द नाहीत.**
>
> **- शिवम भोसले (वडील)**
> **रा.मालठाणा ता. संग्रामपूर जि. बुलढाणा**

**भार्गव याला डिस्चार्ज दिल्या नंतर त्याचे आई-वडील यांनी डॉ. दिनकर राऊत यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांचे हृदय भरून आले डोळ्यात अश्रू आले. या घटनेने डॉ. राऊत सुद्धा भावूक झाले.**

# रोजगार नसल्याने तळोद्यातून गुजरातकडे मजुरांचे लोंढे; रोहयोच्या कामांची तातडीने मागणी

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

जिल्ह्यात स्थानिक पातळीवर रोजगाराची संधी उपलब्ध नसल्याने रोज हजारो मजुरांचे स्थलांतर शेजारच्या गुजरात राज्याकडे सुरू झाले आहे. पावसामुळे शेतीची कामे ठप्प पडल्याने आणि रोजगार हमीची (रोहयो) कामे वेळेवर सुरू न झाल्याने मजुरांसमोर मोठा प्रश्न उभा राहिला आहे. गुजरातमध्ये जास्त मजुरी मिळत असल्याने मजुरांनी आतापासूनच आपापली गावे सोडण्यास सुरुवात केली आहे.

यंदा जिल्ह्यात संपूर्ण पावसाळ्यामध्ये पावसाची धुमशान सुरू होती. अगदी परतीच्या पावसानेही धुमाकूळ घातल्यामुळे खरीप हंगामावर मोठा परिणाम झाला. शेतीची काढणी आणि वेचणीची कामे लांबल्यामुळे स्थानिक मजुरांना रोजगाराचा प्रश्न गंभीर बनला आहे. विशेषतः कापसाचे मोठे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचा हंगाम लांबला आहे.

याचवेळी, गुजरात राज्यातील ऊस हंगाम पुढील



पंधरा दिवसांत सुरू होणार असल्याने त्याचबरोबर शेंगा काढणी कापूस वेचणी इत्यादी कामे सुरू होणार असल्याने तेथे मजुरांची मागणी वाढली आहे. गेल्या आठ-दहा दिवसांपासून रोज हजारो मजूर लक्झरी बसने तळोदा सोडून जात असल्याचे चित्र दिसत आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यात स्थलांतराचे प्रमाण अधिक आहे. बोरद परिसरातील मोड, बोरद, मालदा, धनपूर, कढेल यांसारख्या गावांमधून रोज हजारो मजूर स्थलांतर करीत असल्याचे सांगितले जात आहे. संपूर्ण कुटुंबेच स्थलांतर करत असल्याने त्यांच्या मुलं-मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

स्थलांतर करणाऱ्या मजुरांच्या प्रशासनाकडे मुख्य दोन मागण्या आहेत त्यात मजूर सांगतात की, गुजरातमध्ये मजुरीचा दर ४०० रुपयांपेक्षा अधिक आहे, तर रोजगार हमी योजनेचा दर त्या तुलनेत खूपच कमी आहे. एवढ्याशा दरात कुटुंबाचा उदरनिर्वाह होत नसल्याने शासनाने रोहयोच्या दरात ठोस वाढ करावी. तरच स्थलांतर थांबेल. शेतीत काम नसल्याने प्रशासनाने रोजगार हमीची कामे युद्ध पातळीवर हाती घेऊन तातडीने उपलब्ध करावीत. या संदर्भात प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, सध्या तळोदा तालुक्यात घरकुल, फळ लागवड, वृक्ष लागवड यांसारखी रोजगार हमीची कामे सुरू आहेत. तसेच, मजुरांना कामे मागता यावीत म्हणून ग्रामपंचायत स्तरावर हेल्पलाइन नंबर देखील सुरू करण्यात आले आहेत.स्थलांतराची समस्या स्थानिक पातळीवरच सोडवण्यासाठी प्रशासनाने 'मुळवाट' नावाचा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमातून मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यासह त्यांचे रेशन, आरोग्य सेवा यांसारखे प्रश्न मार्गी लावण्याचे नियोजन आहे.मजुरांनी स्पष्ट केले आहे की, प्रशासन जोपर्यंत मजुरीचा दर वाढवत नाही आणि तातडीने पुरेसा रोजगार उपलब्ध करत नाही, तोपर्यंत हे स्थलांतर कोणीही थांबवू शकणार नाही.

# करुणा-मैत्रीच्या मार्गानेच मानवतेचा उद्धार धम्मपरिषदेत डॉ.खेमधम्मो महाथेरोंचे प्रतिपादन

## शिवणी येथे महाविहार धम्मभूमीत लोटला जनसमुदाय

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

जगाला प्रज्ञा, शील, करुणा-मैत्रीची शिकवण देणारा, मानवतेचा खरा दीपस्तंभ म्हणजे सम्यक संबुद्ध गौतम बुद्ध होय. त्यांनी दिलेला धम्म म्हणजे केवळ एका धम्मपथाचा उपदेश नसून, मानवी जीवनाला दिशा देणारा शाश्वत मार्ग आहे. असे विचार उदघाटक भदंत डॉ. खेमधम्मो महाथेरो यांनी व्यक्त केले.बीड तालुक्यातील महाविहार धम्मभूमी डॉ. भदंत आनंद कौसल्यायन नगर, शिवणी ता. जि. बीड येथे गुरुवार दि. २ ऑक्टोबर रोजी ६९ व्या धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाच्या अनुषंगाने अखिल भारतीय सहावी बौद्ध धम्मपरिषद पार पडली. सदरील धम्मपरिषद प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्थेकडून आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी उदघाटक भदंत डॉ. खेमधम्मो महाथेरो बोलत होते.या धम्मपरिषदेला संस्थेचे सचिव तथा धम्मपरिषदेचे मुख्य संयोजक भिक्खु धम्मशील थेरो, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून भदंत डॉ. इंदवंस्स महाथेरो, प्रमुख मार्गदर्शक भिक्खु उपगुप्त महाथेरो,



प्रमुख अतिथी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, एसपी नवनीत कॉवत, समाज कल्याण आयुक्त प्रदिप भोगले, समाज कल्याण आयुक्त रविंद्र शिंदे, समाज कल्याण सहसंचालक डी. बी. क्षीरसागर, उपायुक्त उमेश सोनवणे, शास्त्रज्ञ डॉ. सिध्दार्थ जोंधळे, प्रमुख धम्मदेसना भिक्खु पय्यातीस महाथेरो, भिक्खु महाविरो थेरो, भिक्खु नागसेन, भिक्खु धम्मघोष, भिक्खु चंद्रमुनी, भिक्खु धम्मप्रिय, भिक्खु पय्यावर्धन, भन्ते बुद्धबोधी आदींची उपस्थिती होती.पुढे धम्मदेसना देताना भदंत डॉ. खेमधम्मो महाथेरो म्हणाले की, गौतम बुद्धांच्या शिकवणीमुळे समाजातील अंधश्रद्धा, भेदभाव आणि असमानता यांना जबर धक्का बसला. म्हणूनच विज्ञानावर आधारलेला बौद्ध धम्म आज जागतिक पातळीवर स्वीकारला जात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे आपल्याला बौद्ध धम्माची दीक्षा देवून उद्धार केला आहे. त्या धम्म प्रवर्तन दिनाला आज ६९ वर्षे पूर्ण होत आहेत. तसेच भिक्खु धम्मशील थेरो यांच्या संयोजनातून ही धम्मपरिषद होत असून ही बाब गौरवास्पद आहे. त्यामुळे बौद्ध धम्माचा प्रसार आणि प्रचार अधिक गतीने होण्यास मदत होत आहे. असे विचार त्यांनी व्यक्त केले.या धम्मपरिषदेचे प्रस्ताविक डॉ. नामदेव शिनगारे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अशोक गायकवाड यांनी तर आभार गुलाबराव भोले यांनी मानले. अखिल भारतीय सहाव्या बौद्ध धम्मपरिषदेला जनसमुदाय लोटला होता. दरम्यान शाहीर प्रा. दीपक जमदाडे यांचा भिम व बुद्ध गीतांचा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला.तसेच संविधान ग्रुपकडून दोनशे संविधान प्रति वाटप करण्यात आल्या होत्या.ही धम्मपरिषद यशस्वीपणे पार पडण्यासाठी प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्थेकडून अतिशय देखणे नियोजन करण्यात आले होते.

# डोके शांत असेल तर हृदय देखील चांगले राहते

भारतात एक म्हण प्रसिद्ध आहे चिंता ही चिता समान असते. ही म्हण आरोग्य आणि विज्ञानावर आधारलेली वाटते.चिंता म्हणजे -पुळशीं, आजकाल प्रत्येकजण तणाव आणि चिंतेखाली आहे. मग तो कामाचा दबाव असो की आर्थिक तंगी वा व्यक्तिगत आव्हाने. आपल्या मनाचे विचारचक्र सतत धावत असते. थोडीबहुत चिंता असणे योग्य आहे. परंतू सतत होत असलेली चिंता आपल्या मानसिक आणि शारीरीक आरोग्यावर मोठा परिणाम करते. खास करुन आपल्या हृदयावर याचा वाईट परिणाम होत असतो. या त्यामुळे मेंटल हेल्थला गांभीर्याने घ्यायला हवे.अमेरिकन हार्ट एसोसिएशनच्या मते तणाव आणि चिंता ही हृदयाच्या आजाराची अप्रत्यक्ष कारणे आहेत.त्यामुळे तुमच्या मनाला शांत करण्याबरोबरच हृदयाचे संरक्षण करण्यासाठी काही सोपे उपाय आहेत.यात एक प्रकार माईंडफूलनेस आहे.ध्यान लावण्याची ही जुनी पद्धस्थ,चिंता कमी करणे आणि एकूणच आरोग्यात सुधारणा आणते.

**हृदयाला आरोग्यादायी राखण्यासाठी माईंडफुलनेस टीप्स**

१. खोल श्वास घ्या

खोल श्वास घेणे माइंडफुलनेसचा सर्वात सोपा आणि प्रभावी उपायांपैकी एक आहे. चिंता करत असताना आपला श्वास हळू किंवा जोरजोरात होतो. त्यामुळे हृदयाचे ठोके आणि ब्लड प्रेशर वाढत असते. आपल्या श्वासाला सावकाश केल्याने शरीराचा 'रेस्ट एण्ड डायजेस्ट' रिस्पॉन्स सक्रीय होतो. यासाठी आधी आरामात बसा, आपले डोळे बंद करा आणि १ ते ४ आकडे मोजत नाकाने खोल श्वास घ्या. एक क्षणासाठी थांबा आणि पुन्हा १ ते ६ आकडे मोजत हळूहळू तोंडाने श्वास बाहेर काढा. ही क्रिया पाच मिनिटे पुन्हा पुन्हा करत रहा. ज्यावेळी आपल्याला चिंता वाटत असेल त्यावेळी ही क्रिया करा. ही क्रिया काही काळाने तुमच्या मनाला शांत करेल. आणि तुमच्या हृदय प्रणालीला तणावाशी सामना करायला मदत करेल.

२. बॉडी स्कॅनचा अभ्यास करा

तुम्ही कधी विचार केला आहे का चिंता शारीरिक रुपाने कशी प्रकट होते. खांद्याचा तणाव, जबडा कसणे आणि हृदयाची ठोके वाढणे याची सामान्य लक्षणे आहेत. बॉडी स्कॅन ध्यानाने आपल्याला या तणावाला ओळखणे आणि त्याला दूर करण्यास मदत करते.

सर्वात आधी बसण्यासाठी एक शांत जागा निवडा. हळू-हळू आपले लक्ष डोक्यापासून पायापर्यंत आणा. कोणत्याही ताणाशिवाय श्वास न सोडल्यानंतर तो तणाव समाप्त झाल्याची कल्पना करा. जे या तंत्राचा अभ्यास करतात त्यांच्या नुसार याने झोपेची समस्या देखील दूर होते. आणि हृदयावरील तणाव देखील दूर होतो.

३. माईंडफुल वॉक करा

जर एका जागी तुम्हाला ध्यान लावून बसणे अवघड वाटत असेल तर माईंडफूल वॉक करण्याचा चांगला पर्याय होऊ शकतो. त्याचा अभ्यास तुम्हाला फिजिकल एक्टीव्हीटी (शारीरीक हालचाली) आणि माईंडफुलनेस प्रॅक्टीस दोन्ही लाभ एकसाथ होऊ शकतात. यासाठी तुम्ही शांत वातावरणात १० ते १५ मिनिटे पायी चाला. आपल्या पावलांची लय, जमीनीवर पायांचा स्पर्श होण्याचा अनुभूती आणि आजूबाजूच्या आवाजांवर लक्ष द्या. जर तुमचे मन सैरवैर भटकू लागले तर आपले लक्ष पुन्हा आपल्या चालण्याच्या क्रियेवर केंद्रीत करावे. हा व्यायाम केवळ तुमच्या हृदयाच्या आरोग्यासाठी चांगला नसून तुमचे मान शांत करण्याचा चांगला उपाय आहे

# 'वेळेत निधी, वेळेत काम' धोरणाची अंमलबजावणी करा-पालकमंत्री कोकाटे

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

जिल्ह्याच्या विकासाला गती देण्यासाठी आणि नागरिकांना योजनांचा त्वरित लाभ मिळावा यासाठी, महाराष्ट्र शासनाच्या 'वेळेत निधी व वेळेत काम' या धोरणाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री तथा पालकमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी दिले आहेत. ते ०३ ऑक्टोंबर, २०२५ रोजी जिल्हा नियोजन सभागृहात आयोजित जिल्हा आढावा बैठकीत बोलत होते.

पालकमंत्री ॲड. कोकाटे यांनी यावेळी स्पष्ट केले की, शासनाचा हा नवा निर्णय केवळ निधी वेळेत वापरण्यासाठी नाही, तर वेळेत काम पूर्ण करणे, आर्थिक शिस्तीचे काटेकोर पालन आणि पारदर्शकता यासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. अनेकदा निधी वर्षाच्या शेवटी खर्च होतो किंवा शिल्लक राहतो, ज्यामुळे कामे रखडतात. या अडचणींवर मात करण्यासाठी शासनाने निधीचे वेळेत वितरण व योग्य पुनर्विनियोजन करण्याची स्पष्ट कार्यपद्धती निश्चित केली आहे.

बैठकीत वेळेत काम पूर्ण करण्यासाठी खालील महत्त्वाच्या सूचना व कालमर्यादा निश्चित करण्यात आल्या त्यात जिल्हा नियोजन समित्यांच्या नियमित बैठका दर ९० दिवसांनी होतील.

सर्व यंत्रणांनी येत्या पंधरा दिवसांत आपल्या योजनांना प्रशासकीय मान्यता घेणे बंधनकारक आहे. प्रशासकीय मान्यतेची कालमर्यादा एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीसाठी असेल. पुनर्विनियोजन डिसेंबर अखेरपर्यंतच, तेही कमाल १० टक्क्यांपर्यंत करता येईल.

१० लाखांपेक्षा जास्त खर्चाच्या कामांसाठी ई-निविदा प्रणाली आवश्यक आहे, तसेच निधी वितरणात पारदर्शकतेसाठी व्हर्च्युअल पर्सनल



डिपॉझिट अकाउंट प्रणाली बंधनकारक आहे.

विकासाच्या कामांचा दर्जा तपासण्यासाठी, जिल्हाधिकारी व समिती सदस्यांनी किमान १० टक्के कामांची, तर उपआयुक्त (नियोजन) यांनी किमान ५ टक्के कामांची प्रत्यक्ष तपासणी करून शासनाला अहवाल सादर करणे बंधनकारक केले आहे. जिल्हा परिषदेंतर्गत सन २०२३-२४ चा बहुतांश निधी खर्च न झाल्याने 'लॅप्स' झाल्याबद्दल पालकमंत्र्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. या संदर्भात, जबाबदार अधिकारी, कामे न करणाऱ्या यंत्रणा आणि ठेकेदार यांचा अहवाल येत्या १५ दिवसांत सादर करून तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच, चालू आर्थिक वर्षातील (२०२५-२६) निधी मार्च अखेरपर्यंत पूर्ण खर्च करण्याचे बंधन घालून, निधी खर्च न करणाऱ्या यंत्रणांना भविष्यात निधी वितरित न करण्याचा इशारा दिला.

बैठकीदरम्यान नाविन्यपूर्ण योजनेतून २०० विद्यार्थ्यांसाठी उच्चशिक्षण, स्पर्धा परीक्षा आणि रोजगाराच्या संधी निर्माण करणाऱ्या प्रकाशवाटा या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले, तसेच शाश्वत विकास ध्येये या जिल्हा निर्देशांक अहवालाचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.या बैठकीस माजी मंत्री तथा आ. डॉ. विजयकुमार गावित, आ. शिरीषकुमार नाईक, आ. आमशा पाडवी, जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस. यांच्यासह विविध यंत्रणांचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

## पूरग्रस्तांच्या मदतीसाठी शिवमाला फाउंडेशनचा सहभाग,विद्यार्थ्यांना केले शैक्षणिक साहित्य वाटप



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मांजरा नदीकाठच्या लोकांचे अतोनात नुकसान झाले असून सरकारची कुठलीही मदत अजून शेतकऱ्याला मिळालेली नाही.परंतु राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती दिवशी शिवमाला फाउंडेशन पुणे यांच्या वतीने केज तालुक्या तील मौजे राजेगाव, दैठणा,पीट्टीघाट येथील जिल्हा परिषदप्राथमिक शाळेत जाऊन तेथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे किट वाटप करण्यात आले. त्यामध्ये स्कूल बॅग, वह्या,पॅड,कंपास, पाण्याची बॉटल व खाद्यपदार्थांचे वाटप करण्यात आले.यावेळी शिवमाला फाउंडेशन पुणे चे अध्यक्ष प्रवीण शिवाजीराव मोरे, सदस्य रत्नमाला मोरे, ऐश्वर्या मोरे,पूजा हंडीबाग,नितीनजी भिसे,दुआ खान,सुरैया पठाण,अजय कांबळे, यशवंत मोरे,गणेश मोरे हे उपस्थित होते.तसेच राजेगाव दैठणा येथील सरपंच ,उप सरपंच, पत्रकार रविंद्र मेटे तसेच गावातील तरुण मंडळी या कार्यक्रमातसहभागी होते.राजेगाव येथे कार्यक्रमाचे सूत्र संचालन शाळेचे मुख्याध्यापक वरवडे रमेश सर यांनी केले व आभार गावचे ज्येष्ठ नेते युवराज कदम यांनी मानले.

## साबला येथे ग्राम स्वच्छता अभियान संपन्न



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे साबला येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी , भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त. तसेच दसरा विजयादशमी निमित्त ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले .

गावातील वातावरण स्वच्छ रहावे , गावात रोगराई पसरु नये , गावातील सर्व जनतेचे आरोग्य चांगले रहावे , कोणीही आजारी पडू नये , मी गावाचा , गावातील माझा , स्वच्छ गाव, सुंदर गाव , हा विचार करून. साबला नगरीत नेहमीच स्वच्छ ते बाबत माहिती दिली जाते . तसेच साबला नगरीतील नागरिक ही याबद्दल जागरुक आहेत. या ग्रामस्वच्छता अभियानात समाजसेवक नरहरी काकडे , ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ , चेरमन उत्तमराव काकडे , गणेश कटारे , काशिनाथ नाईकनवरे , लखन राऊत , हनुमंत परळकर , राहुल मुळे , नजीर काझी , महादेव परळकर , अक्षय काकडे , रामहरी काकडे , धनंजय नाईकनवरे , कल्याण भोसले , विश्वनाथ नाईकनवरे .साबला नगरीतील इत्यादी नागरिकांनी या ग्रामस्वच्छता अभियानात सहभाग घेऊन . साबला नगरीत ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले .

## पवनराजे इंग्लिश स्कूलमध्ये गांधी जयंती उत्साहात साजरी



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज येथील पवनराजे इंग्लिश स्कूलमध्ये महात्मा गांधी यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी गांधीजींच्या विचारांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम, देशभक्तीपर गीत व भाषण सादर करून उपस्थितांचे मन जिंकले. शाळेत विद्यार्थ्यांना अहिंसा, सत्य आणि स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. शिक्षकांनी गांधीजींच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना त्यांच्या विचारांचा जीवनात अवलंब करण्याचे आवाहन केले.या कार्यक्रमात मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. शेवटी स्वच्छ भारत अभियानाचा संदेश देत कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

## धम्मदीप बुद्ध विहार बीड येथे ६९ वा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

शिवाजीनगर बीड येथील धम्मादीप बुद्ध विहार येथे ड तेजस वडमारे व बुद्ध विहार कमिटी तर्फे आयोजित अशोक विजया दशमी व धम्मचक्र आनुप्रवर्तन दीना निमित्त प्रमुख पाहुणे मा.नगरसेवक विनोद जी मुळूक व मा नगरसेवक विलास बाप्पा विधाते यांची उपस्थिती होती मान्यवारांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करून आपले आदर्श तथागत गौतम बुद्ध, प्रियदर्शी राजा सम्राट अशोक, महामानव बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज त्यागमूर्ती माता रमाई यांना अभिवादन करण्यात आले धम्माचक्र प्रवर्तन दिनाचे महत्व ड तेजस वडमारे यांनी सांगताना म्हणाले सिद्धार्थ गौतमाला ज्ञानप्राती झाल्यानंतर तथगत भगवान बुद्धांनी आषाढ पौर्णिमेच्या दिवशी सारनाथ येथे पाच परिव्राजकांना धम्मोपदेश देवून प्रथम धम्मचक्र प्रवर्तन



केले.यालाच गुरुपौर्णिमा म्हणतात त्यानंतर प्रियदर्शी सम्राट अशोक राजाने युद्ध जिंकल्या नंतर त्याचे मन खिन्न झाले व त्याने हातातील तलवारीचा कायम त्याग करून युद्धसोडून बुद्ध धम्माला शरण आला व धम्मदिक्षा घेतली तो दिवस अश्विन शुक्ल- दशमी हा होता. म्हणून या दिवसाला सम्राट अशोक विजय दशमी असे म्हणतात याच ऐतिहासिक अशोक विजय दशमी चे महत्व बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समजून घेतले व आपल्या लाखो अनुयायांसह भारतातील नागाची भूमी असलेल्या नागपूर येथे धम्मदिक्षा घेवून, ख-या अर्थाने धम्मचक्र अनुवर्तन अर्थात, धम्मचक्राला गतिमान केले.या सामुदायिक धर्मांतर सोहळयाला 'धम्मचक्र अनुप्रवर्तन असे म्हणतात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर करांनी हे धर्मांतर जगातील सर्वात मोठे धर्मांतर घडवून आणून भारतातून नष्ट झालेला बुद्ध धम्माचे पुनरुत्थान केले असे मतव्यक्त केले त्या नंतर वर्षावासानिमित्त सुरू असलेले बुद्ध आणि त्याचा धम्मग्रंथाचे वाचन बौध्दाचार्य अंकुश चव्हाण सर यांनी केले ग्रंथ वाचनाचा दिन ८५ वा शेवटी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञा चे सामूहिक पठण करून संकल्प करण्यात आला त्यावेळी अंजली तेजस वडमारे, उर्मिला वडमारे, आशा धनवे, अंजली विशाल वडमारे,सरिता खेमाडे, कोमल वाघमारे, आशा भालेराव, छाया जोगदंड, अर्चना जाधव, प्रीती जाधव,पंचफुला वाघमारे, सरवदे ताई, गौतम खेमाडे, आर्यन खेमाडे, निवृत्ती वाघमारे, दिलीप गवळी, रोहन गुजर पंकज भाऊ, साधना खेमाडे, दिपाली जाधव,आशा बाई खेमाडे, निलेश वाघमारे, नागेश वाघमारे, आदित्य खेमाडे, सिद्धार्थ वडमारे, आरती जोगदंड, नितीन लोखंडे बलभीम नगर,मित्र नगर छत्रपती शिवाजीनगर, दिलीप नगर परिसरातील सर्व बौद्ध उपासक उपासिका बालक बालिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कुक्कडगाव येथे दिनांक ५ ऑक्टोबर रोजी एकदिवसीय समता सैनिक दल शिबिराचे आयोजन-कॅप्टन राजाभाऊ आठवले

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक : ५ ऑक्टोबर रविवार रोजी कुक्कगाव येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या समता सैनिक दलाचे एकदिवसीय शिबिर घेण्यात येणार आहे. तरी समता सैनिक होऊ इच्छिणाऱ्या आसपासच्या गावातील बौद्ध तरुण - तरुणी, महिला व पुरुषांनी समता सैनिक दल शिबिरामध्ये सामील व्हावे असे कॅप्टन राजाभाऊ आठवले मेजर जनरल समता सैनिक दल, बीड यांनी आवाहन केले आहे. २० मार्च १९२७ महाडच्या सत्याग्रह दिनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी समता सैनिक दलाची स्थापना केलेली आहे. २० मार्च २०२७ ला समता सैनिक दलाला १०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्या अनुषंगाने एक लाख समता सैनिक करण्याचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नातू आदरणीय डॉक्टर भीमराव यशवंतराव आंबेडकर साहेब यांनी संकल्प केला आहे. या संकल्प पूर्तीसाठी सर्व बौद्ध बांधव भगिनींनी समता सैनिक दलामध्ये सामील व्हावे व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ गतिमान करावी. या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक म्हणून आदरणीय सुजाता प्रशांत वासनिक कंपनी कमांडर व आदरणीय प्रतिभा रणजीत वाघमारे कंपनी कमांडर या उपस्थित राहणार आहेत. तरी आसपासच्या खेड्यातील सर्व बंधु - भगिनी , उपासक-उपासिकांनी या समता सैनिक दल शिबिरासाठी उपस्थित राहावे ही विनंती. हे शिबिर सकाळी दहा वाजल्यापासून पाच वाजेपर्यंत राहील. येता वेळेस दोन पासपोर्ट फोटो व एक आधार कार्ड झेरॉक्स ची कॉपी सोबत घेऊन यावी. दुपारचे जेवण दिले जाईल याची नोंद घ्यावी. व जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे.

## सोनीजवळा येथे विजयादशमी निमित्त महाप्रसादाचे आयोजन

### ओबीसी नेते गोविंद ससाणेचा अनोखा उपक्रम

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

विजयादशमी दसऱ्या निमित्त भवानी नगर, सोनीजवळा येथे आई जगदंबामंदिर परिसरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. गावातील सर्व भाविक भक्तांसाठी सुरू करण्यात आलेली ही परंपरा यंदापासून दरवर्षी राबवली जाणार आहे.नवरात्र उत्सव कमिटीचे सदस्य अरबाज,फुलचंद, भालचंद्र, अरुण,हाजू, रज्जाक,दशरथ, सुनील, विनोद, दीपक, साहेबा, पोपट,बबनराव, बाबु, रामभाऊ,अमोल, मकरध्वज, ओम,जब्बार, आसेफ भाई,संभू अण्णा,रवी,पप्पू आणि सर्व कार्यकर्त्यांच्या अथक प्रयत्नातून या महाप्रसादाचे यशस्वी



आयोजन झाले.या महाप्रसादासाठी विशेष सहकार्य गोविंद ससाणे अध्यक्ष,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तालुका ओबीसी सेल,मिनाज पठाण संचालक,अंबाजोगाई सहकारी कारखाना आणि रज्जाक पठाण यांनी केले.गोविंद ससाणे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, गावातील ऐक्य आणि भक्तिभाव जपण्यासाठी ही महाप्रसाद परंपरा यंदापासून दरवर्षी विजयादशमी दसरा या दिवशी सुरू राहील.या उपक्रमामुळे गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, सर्व जाती धर्माचेशेकडो गावकरी आणि भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

## पंकजाताई मुंडेंचा सावरगाव घाट येथे दसरा मेळावा हा रेकॉर्डब्रेक गर्दीचा ठरला

### सुरज भैय्यांनी तीन हजार भाविकांसाठी केली भव्य भोजन व्यवस्था

### येवता जिल्हा परिषद सर्कल मधून २०० गाड्यांचे नियोजन

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

येवता जिल्हा परिषद सर्कल मधून पर्यावरणमंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या सावरगाव घाट येथील दसरा मेळाव्यासाठी यावर्षी भव्य नियोजन करण्यात आले.भगवान भक्ती गडावर दरवर्षीप्रमाणे यंदाही प्रचंड जनसागर उसळला होता.

यामध्ये पहिल्यांदाच भाजपचे युवा नेते सुरज भैय्या घुले यांनी जवळपास तीन हजार भाविकांसाठी जेवणाची व्यवस्था करून वेगळाच ठसा उमटवला आहे.आपल्या सोबत असणाऱ्या कार्यकर्त्यां बरोबरच इतर भाविकांसाठीही त्यांनी उत्कृष्ट जेवणावळ उभी केली होती.तसेच यावेळी १५० ते



२०० गाड्यांचे प्रभावी नियोजन करून भाविकांच्या ये-जा व्यवस्थेत मोठा दिलासा दिला.यंदाचा दसरा मेळावा हा रेकॉर्डब्रेक गर्दीचा ठरला. नेहमीच पर्यावरणमंत्री ना.पंकजाताई मुंडेच्या कार्यावर प्रचंड निष्ठा ठेवणारा चेहरा म्हणून सुरज भैय्या घुले पुढे येत आहेत. सातत्यपूर्ण सामाजिक व राजकीय उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग सुरज भैय्या घुले यांचा असतो संघटनात्मक टीमवर्क ही त्यांची कार्यशैली लोकांच्या मनात घर करून राहिली आहे.आता हा तरुण पुढे कोणती संधी मिळवतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## महात्मा फुले स्मारक समिती तर्फे धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा

# धम्मचक्र प्रवर्तन दिन हा मानवमुक्तीचा लढा-डॉ.राजेश इंगोले

## तथागत गौतम बुद्ध ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर हा अलौकिक इतिहास-प्रा.डॉ.कीर्तिराज लोणारे

**दैनिक वादळ वार्ता**
**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील महात्मा फुले स्मारक समिती तर्फे धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहामध्ये साजरा करण्यात आला. यावेळी विचारमंचावर स्मारक समितीचे अध्यक्ष सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले, प्रमुख व्याख्याते म्हणून पाली इतिहास संशोधक प्रा.डॉ.कीर्तीराज लोणारे, कार्यकारी अध्यक्ष प्रा.बी.के.मसने, उपाध्यक्ष प्रा.डॉ.अनिल नरसिंगे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहणाने झाली. यावेळी महापुरूषांच्या प्रतिमांचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा.डॉ.किरण चक्रे यांनी भारताचा इतिहास स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये आणि स्वातंत्र्योत्तर काळामध्ये कशा बदलत गेला आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची राष्ट्रनिर्माते म्हणून भूमिका यावर विवेचन करीत महापुरूषांच्या विचारांचा वारसा जोपासण्याचे काम महात्मा फुले स्मारक समिती करीत आहे असे प्रतिपादन केले. तर प्रा.बी.के.मसने यांनी संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे बहुजन समाजाला न्याय मिळाला आहे सामाजिक प्रवाहामध्ये स्थान मिळालेले आहे त्यामुळे साळी, माळी, कोळी, तेली, तांबोळी यांनी संविधान निर्मात्याचे उपकार मानायला हवे अशा शब्दांत परखड मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याता प्रा.कीर्तीराज लोणारे यांनी तथागत गौतम बुद्ध यांच्या काळात मानवतेचे मूल्य जपणाऱ्या, माणसांमध्ये प्रेम वृद्धिंगत करणाऱ्या,जाती, धर्म, लिंग, भेद याला कसलेही



स्थान न देणाऱ्या बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार संपूर्ण जगामध्ये कसा झाला. तथागत गौतम बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर सम्राट अशोकाच्या काळामध्ये बौद्ध धम्माला राजाश्रय मिळाला. कलिंग युद्धानंतर झालेल्या विनाशा नंतर सम्राट अशोकाला शांतीचे महत्त्व कळाले, तथागत गौतम बुद्धांच्या विचारांचे महत्त्व कळाले आणि जगाला युद्ध नाही तर बुद्ध हवा या प्रेरणेने सम्राट अशोकाने जगभरामध्ये बौद्ध धम्माचा प्रचार प्रसार केला. सम्राट अशोकानंतर अनेक राजकीय उलथापालथी अनेक परकीय आक्रमणे यामध्येही बौद्ध धम्म आपले अस्तित्व टिकवून ठेवले.याचे कारण सम्राट अशोकाने जी शिलालेखे जी बौद्ध मंदिरे बौद्ध स्तूप गुहालेखे याद्वारे बौद्ध धम्माचे विचार दगडांवर कोरून ठेवले त्यामुळे बौद्ध धम्म भारतामध्ये टिकून राहिला. त्यानंतर सर्वांत मोठी क्रांती डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १९५६ साली नागपूर येथे आपल्या पाच लाख अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेऊन केली. यावेळी बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अनुयायांना प्रत्येक गोष्टीची चिकित्सा केली पाहिजे आणि चिकित्सेनंतरच ती गोष्ट स्वीकारली पाहिजे असे सांगत मला तथागत गौतम बुद्ध व बौद्ध धम्माची शिकवण पटलेली आहे त्यामुळे मी बौद्ध धम्म स्वीकारत आहे. तुम्हालाही चिकित्सा करून जर हा धम्म पटत असेल तरच तुम्ही या धम्मामध्ये या असे भावनिक आवाहन केले होते. प्रा.कीर्तीराज लोणारे यांनी हा संपूर्ण इतिहास आपल्या सोप्या भाषेमध्ये अत्यंत मार्मिक आणि प्रभावीपणे मांडत श्रोत्यांची मने जिंकली. अध्यक्षीय समारोप करताना डॉ.राजेश इंगोले यांनी आपल्या रसपूर्ण शैलीत तथागत गौतम बुद्ध, सम्राट अशोक, संत तुकाराम महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, गाडगे महाराज, तुकडोजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे स्वातंत्र्य समता, बंधुता आणी न्याय ही मानवी मूल्य जोपासणारे विचारांची माळ आहे भारतीय इतिहासात या सर्वांचा नाम उल्लेख झाल्याशिवाय ही कडी पूर्ण होऊ शकत नाही असे गौरवोदगार काढले. डॉ.इंगोले यांनी स्वातंत्र्यपूर्व भारत, स्वातंत्र्यानंतरचा भारत, डॉ.आंबेडकरांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेण्याआधीचा समाज आणि दीक्षा घेतल्यानंतरचा समाज अशी मांडणी करत यावर सविस्तर विश्लेषण केले. आपल्या मार्मिक प्रभावी भाषणामध्ये त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाकडून काय अपेक्षा केली होती आणि समाज नेमके काय करतो आहे यावर भाष्य केले. बौद्ध धम्माची दीक्षा घेतल्यानंतरचा समाज हा जबाबदार असायला हवा होता. या समाजाने बहुजन समाजाला योग्य मार्गदर्शन करत मोठ्या भावाच्या भूमिकेत असायला हवे होते. परंतु, दुर्दैवाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेली ही गोष्ट साध्य झाली नाही आणि त्यामुळे डॉ.आंबेडकरांचे, सारा भारत बौद्धमय करेल हे स्वप्न अपूर्ण राहिले. समाजाची प्रगती जर करायची असेल तर आपल्याला शासनकर्ती जमात बनावे लागेल हे डॉ.आंबेडकरांनी स्पष्टपणे सांगितले होते. त्यासाठी शिक्षणाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. परंतु, बहुजन समाजाला शिक्षणाचे महत्त्व समजले नाही त्यामुळे हा समाज आजही विज्ञानाला सहजासहजी न स्वीकारता परंपरेने आलेले विचार अंधश्रद्धा हे सहजपणे पाळतो ज्या चिखलातून डॉ.आंबेडकरांनी बहुजन समाजाला वर काढण्याचा प्रयत्न केला. पण, दुर्दैवाने मानसिक गुलामगिरीमुळे बहुजन समाज परंपरेच्या जोखडात जखडून जाऊन हतबल झाल्याचे चित्र आजही पहावयास मिळते. हे चित्र जर बदलायचे असेल तर शिक्षित समाजाची भूमिका खूप महत्त्वाची आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मानवमुक्तीचा लढा उभारत गुलामगिरीचे जीवन जगत असलेल्या बहुजन समाजाला सामाजिक प्रवाहात आणले आणि गुलामगिरीचा जोखडातून त्यांना मुक्त केले हा जगातला सर्वांत मोठा मानवी मुक्तीचा लढा व क्रांती होती असे प्रतिपादन डॉ.इंगोले यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अनिल नरसिंगे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा.मिलिंद ढगे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महात्मा फुले स्मारक समितीच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# साळेगाव येथे ६९वा धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा

**दैनिक वादळ वार्ता**
**गौतम बचुटे । केज**

केज तालुक्यातील साळेगाव येथे ६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला.साळेगाव ता केज येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या लाखो अनुयायांसह १४ ऑक्टोबर १९५६ रोजी धर्मांतर केले आणि समता, बंधुता, न्याय, सत्य, अहिंसा या पंचशील तत्त्वासह विज्ञानवादी विचासरणीवर आधारित मानवांचे कल्याणकारी बौद्ध धम्माची दिक्षा घेतली. धर्मांतर करण्या पूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सन १९३५ रोजी नाशिक जिल्ह्यातील येवले येथे धर्मांतराची घोषणा केली. एक्कीविस वर्ष त्यांनी सर्व धर्माचा अभ्यास करून सर्व विचाराअंती बौद्ध धम्म स्विकारला. डॉ



बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या धर्मांतराचे विशेष हे की कोणताही हिंसाचार न होता शांततेच्या।मार्गाने हे धर्मांतर झाले. साळेगाव येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन निमित्त भगवान गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्प व पुष्पहार अर्पण करून बुद्ध वंदना घेण्यात आली. या कार्यक्रमाला आयु. रेखा सरवदे, संगीता बचुटे, महानंदा बचुटे, सिंमिता सरवदे, शारदा सरवदे, नंदा बचुटे, सुमन बचूटे, रेखा सरवदे, दैवशाला सरवदे यांच्यासह बौद्ध अनुयायी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# सद् धम्म सेवा संघाने शील व पंचशिलेचे पालन करावे-साळवे

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । दर्शन डोंगरे**

श्रावस्ती बुद्ध विहार, माजलगाव येथे धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात समाजाकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. या पार्श्वभूमीवर रिपाइं जिल्हाध्यक्ष विजय साळवे यांनी बौद्ध समाजाने विहाराकडे का पाठ फिरवली? असा थेट सवाल उपस्थित करत सद् धम्म सेवा संघाच्या पदाधिकाऱ्यांना परखड शब्दांत कान टोचले.



साळवे म्हणाले, श्रावस्ती बुद्ध विहार हे संपूर्ण समाजाचे आहे. विहार समाजाचे आहे ही भावना लोकांच्या मनात निर्माण करण्याची जबाबदारी धम्मचळवळ चालविणाऱ्यांवर आहे. मात्र समाजामध्ये 'हे विहार आपले नाहीत' असे मत का तयार होते, याचे आत्मपरीक्षण झाले पाहिजे. विहार म्हणजेच समाजाचे आध्यात्मिक केंद्र. त्यामुळे शील व पंचशीलाचे आचरण नेतृत्वाने प्रथम करून दाखवले पाहिजे.ते पुढे म्हणाले की, श्रावस्ती बुद्ध विहाराला दीक्षा भूमीप्रमाणे मानले जाते. मग समाज तिथे यायला का कचरतो? समाजाच्या मनात विहाराविषयी आपलेपणाची भावना कमी होण्यास कोण जबाबदार आहे, हे तपासले गेले पाहिजे. भविष्यातील परिस्थिती गंभीर आहे. मनुवादी व्यवस्था सत्तेवर बसली असून हळूहळू आरक्षण व सवलती संपवल्या जात आहेत. पुढील पिढ्यांसाठी मोठा संघर्ष उभा आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर चालत समाजाने संघटित व्हावे, हेच काळाचे महत्त्वाचे आव्हान आहे.या कार्यक्रमाला कचरु तात्या खळगे, डॉ. श्रीराम खळगे, धम्मानंद साळवे, सचिन उजगरे, उत्तम जोगंदड यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. कचरु तात्या खळगे यांनीही विचार मांडून उपस्थितांना धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमास नवनाथ शिनगारे सर, दशरथ मकसरे, सद् धम्म सेवा संघाचे अध्यक्ष सदाशिव भालेराव, जी. एन. घनघाव, भगवान सातपुते, पांडुरंग जाधव यांच्यासह पदाधिकारी, उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदिवासी विकासाला गती: आय.टी.डी.पी. तळोदा येथे गाभा समितीची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

दिनांक ३ ऑक्टोबर २०२५ रोजी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (आय.टी.डी.पी.), तळोदा येथे गाभा समितीची एक महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात पार पडली. उपविभागीय अधिकारी अजय नवंदर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत आदिवासी विकास योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर सखोल चर्चा करण्यात आली.

यावेळी प्रकल्प अधिकारी, विविध विभागांचे प्रमुख अधिकारी तसेच संबंधित विभागीय प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्ह्यातील आदिवासी बांधवांच्या प्रगतीसाठी रणनीती



ठरविण्यासाठी हा मंच अत्यंत महत्त्वाचा ठरला.

या बैठकीचा मुख्य केंद्रबिंदू प्रलंबित कामे आणि नवीन उपक्रम ठरले. उपविभागीय अधिकारी श्री.नवंदर यांनी विविध विभागांकडून सुरू असलेल्या कामांचा सविस्तर आढावा घेतला. आदिवासी विकास योजनांशी संबंधित अनेक महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या कामांची नोंद घेऊन, त्यांच्या तातडीने अंमलबजावणीसाठी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश देण्यात आले.

नवीन योजना आणि प्रकल्प राबविताना स्थानिक गरजांनुसार प्राधान्यक्रम ठरविण्याचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन यावेळी करण्यात आले. प्रकल्प केवळ कागदावर न राहता, थेट लाभार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवणारे असावेत, यावर जोर देण्यात आला.

गाभा समिती ही आदिवासी विकास योजनांच्या योजनाबद्ध नियोजन आणि अंमलबजावणीसाठी एक कणा मानली जाते. या बैठकीत घेतलेले निर्णय आगामी काळात जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासाला आणि प्रगतीला निश्चितच दिशा देणारे ठरतील, असा विश्वास अध्यक्षीय समारोपात व्यक्त करण्यात आला. आदिवासी विकास कार्याला गती देण्यासाठी अधिकारी वर्ग कटिबद्ध असल्याचे यावेळी स्पष्ट झाले.



,लोकनेते सुंदर रावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि.सुंदरनगर तेलगाव कार्यालयात २ ऑक्टोंबर रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती साजरी करनेत आली...प्रतीमेस विनम्र अभिवादन करताना सचिव सुरेश लगड,दासराव मोरे,महादेव मुरकुटे

# बिलगाव वनक्षेत्रात वन्यजीव सप्ताह उत्साहात साजरा; विद्यार्थ्यांमध्ये झाली जनजागृती

**दैनिक वादळ वार्ता**
**रवींद्र वळवी । मोलगी**

बिलगाव प्रादेशिक वनक्षेत्रातर्फे जागतिक वन्यजीव सप्ताह दिनांक १ ते ७ ऑक्टोबर निमित्त बुधवार, दिनांक १ ऑक्टोबर २०२५ रोजी मौजे त्रिशूल येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेत एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांसमोर पाहुण्यांचा परिचय करून देण्यात आला. त्यानंतर वनरक्षक अशोक पावरा यांनी वन्यजीव कशाला म्हणतात याची माहिती दिली. तसेच वन्यजीवांना त्रास न देता त्यांचे संवर्धन करणे किती गरजेचे आहे, यावर सविस्तर मार्गदर्शन केले. वनरक्षक मंगेश वळवी यांनी आदिवासी बोलीभाषेत वन्यजीवांची ओळख करून दिली. त्यांनी आपल्या भागात आढळणारे वन्यप्राणी व आदिवासी आणि जंगल यांचा असलेला अतूट संबंध यावर कवितेच्या माध्यमातून जनजागृती केली. यावेळी वनपाल भरतसिंग परदेशी यांनी वन्यजीवांची अन्नसाखळी तुटल्यास त्याचे होणारे गंभीर परिणाम यावर विश्लेषण केले. तसेच, मानव आणि वन्यजीव यांच्यातील संघर्ष कशामुळे निर्माण होत आहेत, याची थोडक्यात माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक मोहन पावरा यांनी व वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांमध्ये वन्यजीवांबाबत मोठ्या प्रमाणावर जनजागृती केल्याबद्दल आभार मानले. यावेळी वनविभागातर्फे कार्यक्रमास उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना चॉकलेटचे वाटप करण्यात आले. नंदुरबार वनविभागाचे उपवनसंरक्षक संतोष सस्ते यांच्या आदेशाने, सहायक वनसंरक्षक (रोजगार.हमी.योजना.) संजय साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली व वनक्षेत्रपाल बिलगाव चारुशीला काटे यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम यशस्वी झाला. यासाठी वनपाल भरतसिंग परदेशी, वनरक्षक अशोक पावरा, मंगेश वळवी, प्रमिला पावरा व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077